प्रेस नोट

दिनांक ०३/०९/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक व खाजगी इसम | १) श्री. गणेश गंगाराम खेडेकर, वय-४१ वर्षे, पद- वनपाल, परिमंडळ वन अधिकारी, दापोली यांचे कार्यालय, जालगाव रोड, ता. दापोली जि. रत्नागिरी रा. मुपो. संस्कृती कॉम्पलेक्स, फेस ३, रूम नं. १०१, मालेवाडी, खेर्डी, चिपळुण जि. रत्नागिरी. मुळगांव रेहळ भागाडी, ता. चिपळुण, जि. रत्नागिरी.<br>२) श्री. सचिन गोपाळ आंबेडे, वय-३३ वर्षे, खाजगी इसम, रा. मुपो खेर्डी, पाढरीची वाडी, ता. दापोली जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | परिमंडळ वनअधिकारी दापोली यांचे कार्यालय ता. दापोली, जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाच रक्कम | आरोपी लोकसेवक यांनी ६,५००/-रुपये. |
| तडजोडीअंती मागितलेली रक्कम | आरोपी लोकसेवक यांनी ५,०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | आरोपी लोकसेवक यांचे सांगणेवरून आरोपी खाजगी इसम यांनी ५,०००/-रुपये. |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचा लाकूड विक्रीचा व्यवसाय आहे. त्याकरीता त्यांनी दापोली येथील शेतकरी यांचेकडुन तोडणी केलेली झाडे (जळाऊ लाकूड व इमारती लाकूड) विकत घेतली. सदर झाडे तोडण्याकरीता वनविभागाची परवानगी घेण्यात आली असून, तोडलेल्या झाडांच्या लाकडांची वाहतुकीच्या पासांची मागणी करणेकरीता तक्रारदार यांनी परिमंडळ वनअधिकारी दापोली यांचे कार्यालय येथे जावून वरील आरोपी लोकसेवक व खाजगी इसम यांची दिनांक ०२/०८/२०२० रोजी भेट घेतली. त्यावेळी आरोपी लोकसेवक व खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचेकडे प्रत्येक वाहतुकीच्या पासाकरीता १,३००/- रूपये प्रमाणे ५ पासांचे ६,५००/- रूपये रक्कमेची लाचेची मागणी केली. परंतू सदर लाकूड वाहतुकीच्या पासकरीता शासकिय फि रू. १००/- इतकी असताना आरोपी लोकसेवक व खाजगी इसम तक्रारदार यांचेकडे ५ वाहतुकीच्या पासांकरीता ६,५००/- रूपये इतक्या रक्कमेची लाचेची मागणी करत असल्याची लेखी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांचेकडे दिली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०३/०९/२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे लाकूड वाहतुकीच्या पासाकरीता १,३००/- रूपये प्रमाणे ५ वाहतुकीच्या पासांकरीता ६,५००/- रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती १,०००/- रूपये प्रमाणे ०५ वाहतुकीच्या पासांचे ५,०००/- रूपये त्यांचे कार्यालयात काम करणारे खाजगी इसमामार्फत स्विकारण्याचे मान्य केले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झाल्यानुसार दिनांक ०३/०९/२०२० रोजी सापळा आयोजित करण्यात आला असता, आरोपी लोकसेवक यांचे सांगणेनुसार खाजगी इसमाने तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम ५,०००/-रुपये आरोपी लोकसेवक यांचेसाठी व स्वत:साठी वनक्षेपाल कार्यालय दापोली येथे स्विकारल्यानंतर खाजगी इसम यांना परिमंडळ वनअधिकारी दापोली यांचे कार्यालय, ता. दापोली जि. रत्नागिरी येथे १६.०० वाजताचे सुमारास पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले असुन आरोपी लोकसेवक खेडेकर यांना ताब्यात घेण्यात आले आहे.<br>सदरची सापळा कारवाई पोलीस निरीक्षक श्री. प्रविण कदम व त्यांचा स्टाफ पोलीस हवालदार संतोष कोळेकर, पोलीस नाईक विशाल नलावडे, पोलीस नाईक योगेश हुंबरे यांनी केली आहे. |

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau RATNAGIRI

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

03/09/2020

(प्रविण कदम)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी